





दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | मंगळवार १२ नोव्हेंबर २०२४ | अंक ३३८ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


# प्रत्येक माऊलीच्या खात्यात ७५०० रुपये, लपवून ठेवा: पंकजा मुंडे यांचं लाडकी बहीण योजनेवर मोठं वक्तव्य

**नांदेड प्रतिनिधी**

भाजप नेत्या पंकजा मुंडे यांची नांदेडच्या भोकर येथे प्रचारसभा पार पडली. पंकजा मुंडे यांची भोकर विधानसभेच्या भाजप उमेदवार श्रीजया चव्हाण आणि नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीचे उमेदवार संतुकराव हंबर्डे यांच्या प्रचारासाठी सभा पार पडली. "भोकर विधानसभेच्या उमेदवार ज्याच्या नावात श्री आणि जय अशा श्रीजया चव्हाण. श्रीजया चव्हाण आणि संतुक हंबर्डे दोघांनाही विजयी करा. मी 2009 पासून भाजपाची स्टार प्रचारक आहे. या वेळेस मला निवडणूक लढवायची नाही. मी मोकळीच आहे. त्यामुळे



जास्तीत जास्त सभा घेऊन उमेदवार निवडून आणायचे आहेत. शंकरराव चव्हाण यांच्यासाठी मुंडे साहेब खूप लहान होते. पण काँग्रेसमध्ये असून म्हणायचे मुंडे साहेब मोठे होतील", असं पकंजा मुंडे म्हणाल्या. "राजकारणात नवीन पाऊल ठेवणाऱ्या माणसात निरागसता असते. मला सभेत लोक जवळ पाहिजे. मी एवढी व्हीआयपी नाही. मला एवढी सेक्युरिटी आहे. मुख्यमंत्र्यांची मी लाडकी बहीण आहे. हे सरकार माझं माहेर आहे आणि मी मुख्यमंत्र्यांची लाडकी बहीण आहे. जुन्या सरकारने काही योजना नुसत्या हवेत केल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डायरेक्ट बँकेमध्ये पैसे टाकण्याचा निर्णय घेतला आहे. 2014 पूर्वी महिलांचे अकाउंट नव्हते. नरेंद्र मोदींनी 2014 ला सगळ्या देशाला बँकिंगमध्ये आणलं", असं पंकजा मुंडे म्हणाल्या.

### पंकजा मुंडे लाडकी बहीण योजनेवर काय म्हणाल्या?

"प्रत्येक माऊलीच्या खात्यावर 7500 रुपये आले. या 7500 रुपयांचं काय करायचं? लपवून ठेवा ते. कोण कोण पैसे जपून ठेवतं सांगा बरं. मी तर ठेवते लपून. मला शंभर टक्के खात्री आहे महिलांनी या पैशांनी स्वतःसाठी काहीच केलं नाही. महिला कधीही स्वतःसाठी पैसे खर्च करत नाहीत. म्हातारा सासरा आजारी पडला तर हळूच बिचारी पैसे आणू देती. मुलीच्या क्लासची फी देते", असं पंकजा मुंडे म्हणाल्या.

### पंकजा मुंडे यांचं नागरिकांना कळकळीचं आवाहन

"मी तुम्हाला विनंती करणार आहे. येत्या 20 तारखेला कमळाच्या फुलासमोरचं बटन दाबा. कमळ लक्ष्मीचं वाहन आहे. श्रीजया नवीन उमेदीच्या तरुण चेहरा आहे. संतुक हंबर्डे यांना निवडून द्या. डायरेक्ट सत्तेत जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सांगतील ते माझ्या नांदेड जिल्ह्यासाठी करा", असं पंकजा मुंडे यांनी केली. "इलेक्शनमध्ये फिरून माझा अवतार झालाय. सकाळपासून जेवण नाही. संन्यास नाही रे संन्यास घ्यायचा नाही. मी वनवास भोगला, कष्ट भोगले, मोठ्या बापाच्या घरी जन्म घेऊन अनेक कष्टांना समोर गेले. मी पाच वर्ष कुठे आमदार खासदार होते का? मध्यप्रदेशला गेले.

# डॉ. योगेश क्षीरसागर यांची मोमीनपुरा भागात पदयात्रा

बीड (प्रतिनिधी)
दि.११ : विधानसभेच्या निवडणुकीचा प्रचाराचा पहिला टप्पा संपत आला आहे. महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी रविवारी (दि.१०) बीड शहरातील मोमीनपुरा भागात पदयात्रा काढून नागरिकांशी थेट संवाद साधला. या पदयात्रेचा प्रतिसाद पाहून अल्पसंख्याक समाजाला गृहीत धरणा-या विरोधकांच्या तंबूत घबराट निर्माण झाली आहे.

बीडमध्ये महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मोमीनपुरा भागात पदयात्रा काढली. या पदयात्रेत



नागरिकांची मोठी गर्दी होती. यादरम्यान ठिकठिकाणी त्यांचे स्वागत झाले. नागरिकांसह व्यावसायिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या घड्याळाचा गजर करण्याची ग्वाही दिली. शहरातील मोमीनपुरासह इतर भागात देखील डॉ.योगेश क्षीरसागर यांनी गाठीभेटी घेतल्या. यापूर्वी मराठा, मुस्लिम, ओबीसी समाजाच्या विविध प्रश्नावर डॉ.योगेश क्षीरसागर यांनी वेळोवेळी सकारात्मक भूमिका मांडलेली आहे. त्यांच्याकडे सेक्युलर चेहरा म्हणून बीडकर पाहतात. या इमेजमुळे मुस्लिम समाजातून त्यांना पाठिंबा मिळत असून डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या विजयाचा म र्ग सुकर होत आहे. नुकत्याच झालेल्या पदयात्रेमुळे तर अल्पसंख्याक समाजाला गृहीत धरणा-या विरोधकांच्या तुंबूत घबराट निर्माण झाली आहे.

### अध्यक्षसाहेबांना कधीच विसरू शकत नाहीत..

गेली ३५ वर्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी बीड शहराची सेवा केली. त्यांच्या हातून अल्पसंख्याक समाजाची अनेक कामे झाली. कब्रास्थान, दर्गा अशा स्थळांसह कोट्यावधींच्या निधीतून अनेक विकासकामे झालेली आहे. प्रकृतीच्या कारणास्तव ङ्गअध्यक्षसाहेबफ सक्रिय राजकारणात नसले तरी त्यांना आमचा समाज काहीच विसरू शकत नाही, अशा भावना अनेक मुस्लिम समाज बांधवांनी व्यक्त केल्या.

# राजकमल पेट्रोलियमवर हॅपी अवर्स योजनेला प्रतिसाद

## जीओ बीपीच्या कंपनीकडून पेट्रोलवर मिळणार तीन रुपयांची सुट




बीड (प्रतिनिधी) जीओ बीपी कंपनीने सुरु केलेल्या हॅपी अवर्स योजनेला राज्यभरात प्रतिसाद मिळत असून बीड येथील जीओ बीपीचे अधिकृत विक्रेते राजकमल पेट्रोलियमवर ही योजना लागू आहे. २८ ऑक्टोबर ते १९ नोव्हेंबरपर्यंत ही योजना सुरू असून सध्या राजकमल पेट्रोलियमवर हॅपी अवर्स योजनेला प्रतिसाद मि ळत आहे.

भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किम तींमुळे चिंतेत असलेल्या लोकांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. जीओ बीपी कंपनीने आपल्या पेट्रोल पंपांवर हॅपी अवर्स ही नवीन योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत ग्राहकांना पेट्रोलवर ३ रुपयांची सूट दिली जात आहे. बीडमध्ये पेट्रोलची किंमत १०५.३९ रुपये प्रति लिटर आहे, तर या योजनेअंतर्गत ग्राहक ते फक्त १०२.३९ रुपये प्रति लिटरमध्ये खरेदी करू शकतात. २८ ऑक्टोबरपासून सुरू झालेली ही योजना १९ नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. यावेळी जीओ बीपी पेट्रोल पंपावर सकाळी १० ते संध्याकाळी ५ या वेळेत पेट्रोलवर ३ रुपयांची सूट दिली जात आहे. बीड मधील नगर रोडवर जीओ बीपीचे अधिकृत विक्रेते राजकमल पेट्रोलियम येथे ही योजना सुरू असून ग्राहकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

# मतदानाच्या दिवशी आठवडी बाजार बंद

बीड, दि. ११ : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी बुधवार, २० नोव्हेंबर रोजी मतदान होत आहे. या दिवशी जिल्ह्यातील आठवडी बाजार बंद ठेवावेत, असे आदेश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी अविनाश पाठक यांनी निर्गमित केले आहेत.बीड तालुक्यातील चौसाळा, गेवराईतील गेवराई, गुळज, मारफळा, राजपिंप्री, मालेगाव खु., किनगाव, शिरूर कासारमधील जाटनांदूर, मातोरी, पाटोद्यातील पिट्ठी, आष्टी तालुक्यातील पिंपळा, दौलावडगाव, खडकत, आष्टा ह.ना. केरूळ, डोईठाण, हातोला, माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी, एकदरा, गंगामसला, माजलगाव, वडवणी तालुक्यातील वडवणी, अंबाजोगाईतील लोखंडी सावरगाव, केजमधील लव्हुरी, बोरगाव बु., परळी तालुक्यातील पोहनेर, नागापूर याठिकाणी मतदानाच्या दिवशी भरणारे आठवडी बाजार अन्य दिवशी भरवावेत, असेही आदेशात नमूद आहे.

# क्षीरसागरांनी आमची मते घेऊन आम्हाला वाऱ्यावर सोडले; बीड शहरवासियांची खदखद!

**प्रतिनिधी बीड**

बीड, प्रतिनिधी- बालाघाट अनिलदादा यांच्या पाठीशी पूर्ण ताकदीने उभा राहिल्यानंतर काल दि. ११ नोव्हेंबर रोजी बीड विधानसभेचे उमेदवार अनिलदादा जगताप यांनी आपला प्रचार दौरा बीड शहराकडे वळवला. काल सकाळपासून अनिलदादा यांनी बीड शहरातील संत नामदेव नगर, बालेपीर, पंचशील नगर, खडकपुरा, हिरालाल चौक, इंद्रप्रस्थ कॉलनी, बांगरनाला, अजमेर नगर, गोरे वस्ती, ड्राइवर पॉईंट बार्शी रोड, चक्रधर नगर अशा विविध भागात कॉर्नर बैठका घेऊन नागरिकांशी संवाद साधला. या बैठकात बीड शहरवासियांनी रस्ते, नाली, पाणी, कचरा, पथदिवे या मूलभूत गरजांची पूर्तता सत्ताधारी क्षीरसागर यांनी केली नाही. आम्ही क्षीरसागरांना पुरते वैतागलो असून आता क्षीरसागर मुक्त बीडसाठी आमच्यासमोर फक्त तुम्हीच एक आश्वासक चेहरा आणि नेतृत्व आहात. अनिलदादा आमची तुम्हाला पूर्ण साथ आहे. तुम्ही आमदार होऊन आमचे कैवारी बना आणि आम्हाला विकासाचा चेहरा दाखवा. आशा भावना बीड शहरवासियांनी अ नि ल दा दां स म ोर व्यक्त केल्या. उपस्थित जेष्ठ मंडळी, महिला भगिनी आणि तरुणांनी भरभरून प्रतिसाद देत दादा, यंदा तुम्हाला निवडून आणू. असा आम्ही निर्धार केला असल्याची भावना व्यक्त केली. माजी राज्य मंत्री प्रा. सुरेश नवले यांनी मगरूर क्षीरसागरांपासून बीड मुक्त करण्याचा आम्ही प्रण केला असून आम्हाला तुम ची साथ हवी आहे असे आवाहन केले. बैठकी स्थळी माजी राज्यमंत्री प्रा सुरेशजी नवले आणि अनिलदादा जगताप यांचे आगमन होताच नागरिकांकडून हृदय सत्कार करून जोरदार स्वागत करण्यात आले. म हिला भगिनींनी औक्षण करून विजयासाठी शुभेच्छा दिल्या. अनिलदादा यांच्या प्रचार बैठकांचे प्रस्ताविक प्रतिक कांबळे यांनी केले. याप्रसंगी अनिलदादा जगताप यांच्यासोबत सहकारी कार्यकर्ते समर्थक मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

-----



### क्षीरसागर मुक्त बीड केल्याशिवाय गप्प बसणार नाही- अनिलदादा जगताप

बीड शहरातील विविध भागात प्रचार बैठकीत शहरवासियांनी अनिलदादा यांच्यासमोर दैनंदिन समस्यांचा टाहो फोडल्यानंतर या बैठकीत जेष्ठ मंडळी, महिला भगिनी तथा युवकांच्या समस्या समजून घेऊन अनिलदादा यांनी संवाद साधताना पोकळ आश्वासन नाहीतर तर शब्द दिला की, बीडवासियांच्या मूलभूत गरजा सोडवून बीडचा विकास करण्यासाठी मी उभा आहे. सर्वसामान्य घरातील मी एक शेतक-याचा मुलगा आहे. मला एकदा संधी द्या, तुम्हाला वा-यावर सोडणार नाही, घेतला वसा टाकणार नाही. तुम्हाला छळलेल्या क्षीरसागरांपासून बीड मुक्त केल्याशिवाय मी गप्प बसणार नाही. तुमचे मूलभूत प्रश्न मी सोडविल असे सांगितले. तसेच बीडचा सर्वांगीण विकास करण्यासाठी एकदा आम्हाला संधी द्या, येणा-या २० नोव्हेंबर रोजी सर्वनी एव्हीएम मशीनवरील अनुक्रमांक १३ चिन्ह शिवण यंत्र हे बटन दाबून मतदान रुपी आशीर्वाद द्या असे आवाहन अनिलदादा जगताप यांनी बीड शहरवासियांना केले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

मंगळवार १२ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# इंडिया विन्स फ्रिडम: आत्म चरित्रकार!

मौलाना अबुल कलाम आझाद यांना इंग्रजांनी अहमदनगर येथील तुरुंगात ठेवले होते. त्या वेळी त्यांनी हे उद्गार काढले, “इंग्रजांना मी सत्ताधारी मानत नाही तर त्यांना मी विनंती का करू?” आझाद यांच्या पत्नीचे निधन झाले होते. तेव्हा इंग्रजांनी त्यांना निरोप दिला की, पत्नीच्या दफनविधीसाठी आम्ही तुम्हाला सोडू; पण तुम्ही तसे विनंतीपत्र इंग्रज सरकारला द्या. त्यावेळी त्यांनी इंग्रजांना असे बाणेदार उत्तर दिले. मौलाना आझादांचा जन्मदिवस ११ नोव्हेंबर हा शिक्षण दिवस म्हणून साजरा करण्याचे केंद्र सरकारने नुकतेच जाहीर केले आहे, हे विशेष! अशा निर्भीड वाचस्पतीच्या जयंती निमित्त श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींनी आपल्या शैलीत केलेले त्यांचे हे गुणगौरव!.. संपादक.

मौलाना आझाद यांचा जन्म ११ नोव्हेंबर १८८८ रोजी सौदी अरेबिया या देशातील पवित्र भूमी मक्का येथे झाला. त्यांचे वडील मौलाना खैरुद्दीन हे धर्मगुरू होते. ही भूमी त्यांना न मानवल्याने ते आपल्या कुटुंबासह भारतात आले आणि त्यांनी कोलकाता शहरात वास्तव्य केले. मौलाना आझाद यांच्या मातोश्री मक्का येथील धर्मगुरूंच्या कुटुंबातील होत्या. आई आणि वडील या दोघांकडील घराणे उच्चशिक्षित होते. “मुलाचे पाय पाळण्यात दिसतात” या न्यायाने ते लहानपणापासूनच अतिशय हुशार होते. ते इस्लाम धर्माचे आधुनिक विचारवंत होते. आई आणि वडिलांची घराणी कट्टरपंथी असली तरी आझाद कट्टरपंथी नव्हते. त्यांनी इस्लामचा पवित्र धर्मग्रंथ कुराणाचा अभ्यास करून त्यावर तर्जुमानुल कुरान हे पुस्तकही लिहिले आहे. त्यांना अरबी, फारशी, इंग्रजी व उर्दू या भाषा चांगल्या अवगत होत्या व ते चारही भाषांतून लिखाण करीत असत. ते एक उत्कृष्ट वक्तेदेखील होते. त्यांचे भाषण ऐकण्यासाठी हजारोंच्या संख्येने लोक उपस्थित राहत असत. ते हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक होते. अनेक हिंदू विचारवंत त्यांचे चाहते होते. ते भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामातील एक निष्ठावान शिपाई होते. फारसा गाजावाजा न करता कार्य करीत राहणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते.

मौलाना अबुल कलाम हे भारताचे एक प्रमुख राजकीय पुढारी होते. त्यांचे मूळ नाव मोहिउद्दीन अहमद असे असून अबुल कलाम म्हणजे वाचस्पती ही त्यांची पदवी होती. पुढे आझाद (स्वतंत्र) हे टोपणनावही ते लावू लागले. वडिलांबरोबर सन १८९० साली ते कलकत्याला आले. पारंपरिक मुसलमानी शिक्षण पद्धतीप्रमाणे त्यानी फार्सी, उर्दू व अरबी या भाषांचे प्रथम अध्ययन केले. नंतर त्यांनी तर्कशास्त्र, इस्लाम धर्म, तत्त्वज्ञान व गणित यांचा अभ्यास केला. पुढे सर सय्यद अहमदखान यांच्या लेखांचा परिणाम होऊन त्यांनी इंग्रजीचा अभ्यास स्वतंत्रपणे सुरू केला. इ.स.१९०८मध्ये ईजिप्त, अरबस्थान, तुर्कस्थान, फ्रान्स आदी देशांना त्यांनी भेटी दिल्या. तेथील क्रांतिकारकांच्या संपर्कामुळे त्यांची राजकीय मते बदलू लागली आणि कलकत्त्यास परत येताच हिंदी मुसलमानांनी स्वातंत्र्यसंग्रामात पुढाकार घ्यावा, असे मत त्यांनी प्रतिपादित केले. लोकजागृतीसाठी सन १९१२ साली कलकत्ता येथे त्यांनी अल्-हिलाल हे उर्दू साप्ताहिक सुरू केले. अनेक वृत्तपत्रांतून आझाद या टोपणनावाने ते लेखन करीत. अल्-हिलालमधील प्रखर राजकीय टीकेमुळे ब्रिटिश सरकारने त्यांच्याकडून दहा हजार रुपयांचा जामीन मागितला. आझादांनी तो दिला नाही, म्हणून ते वृत्तपत्र बंद पाडले. दोन वर्षांनी त्यांनी अल्-बलाघ हे दुसरे वृत्तपत्र काढले. त्यामुळे आझादांना अनेक प्रांतांत जाण्यास बंदी घालण्यात आली; पुढे त्यांना सांचीला स्थानबद्ध करण्यात आले. मुसलमानांत त्यांच्या अटकेमुळे नवे वारे संचारले. इ.स.१९२० साली त्यांची सुटका झाली.

भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतला नसता तर त्यांनी गुरू-शिष्य परंपरेत म्हणजेच पीर-मुरीदी परंपरेत खूप चांगले कार्य केले असते. त्यांच्या गळ्यात असणाऱ्या स्वरगंगेत लोक न्हाऊन निघत असत. परंतु संगीत क्षेत्रातही न रमता गांधीजी, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ.राजेंद्रप्रसाद, ॲनी बेझंट, लालबहादूर शास्त्री, वल्लभभाई पटेल यांच्यासमवेत भारतीय स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी उडी घेतली. सुरुवातीला ते सर सय्यद यांच्या विचारांनी भारावलेले होते. परंतु सर सय्यद यांनी इंग्रजांशी मैत्री केल्यामुळे प्रखर राष्ट्रवादी असलेल्या मौलाना आझाद यांनी त्यांच्याशी नाते तोडले. भारत हा आपला देश आहे. त्यावर परकीयांचा ताबा ही दडपशाही आहे, अशी त्यांची भूमिका होती. भारतावर स्वकीयांचीच सत्ता हवी, असे त्यांचे मत होते. कष्ट आणि निष्ठा यावर त्यांची नितांत श्रद्धा होती. शेवटपर्यंत त्यांनी या विचारांवरच वाटचाल केली. इंग्रजांनी १८५७मध्ये संपूर्ण भारतावर ताबा मिळवला. त्याच लढाईत भाग घेणाऱ्या मुस्लिम घराण्यांमधील लोकांची इंग्रजांनी कत्तल केली व त्यांच्यावर अत्याचार केले. काही जणांना काळ्या पाण्याची शिक्षाही दिली तर अनेकांना दिल्लीच्या रस्त्यावर फाशी दिली. यात मुसलमानांची संख्या अधिक होती. कारण इंग्रजांची अशी भूमिका होती की, मुसलमान हे या देशाचे राजे होते. त्या वेळी भारतीय मुसलमानांच्या मनात मोठ्या प्रमाणावर नैराश्य पसरले. पूर्वी बाप वा राजा या भूमिकेत वावरणारे मुसलमान इंग्रजांनी सत्ता बळकावल्यामुळे दुखावले गेले होते. त्यानंतर पन्नास-साठ वर्षांपर्यंत कोणीही मुलसमान इंग्रजांसमोर येण्यास तयार नव्हते. सर सय्यद यांच्यासारखे बुद्धिवंत इंग्रजांशी हात मिळवून त्यांच्या बाजूने बोलत असत. अशा वेळी त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात एका निष्ठावान राष्ट्रवादी मुसलमानाची भूमिका बजावली. मौलाना आझाद देशाची अखंडता अबाधित राखण्यासाठी अहोरात्र झटत होते. गांधीजींशी चर्चा केल्यानंतर त्यांनी देशाचे विभाजन स्वीकारले, पण जे मुसलमान भारत सोडून पाकिस्तानला स्थलांतरित होत होते, त्यांना त्यांनी विरोध केला होता. ते हिंदू-मुस्लिम ऐक्याचे सच्चे प्रतीक होते.

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाकडे शासन आधिका-यांचे दुर्लक्ष तर निवडणुकीच्या धामधुमीत पुढा-यांना विसर :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.११ ) सध्याच्या विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनाची आर्थिक मदत मिळण्यास विलंब होत आहे . शेतकऱ्यांच्या आत्म हत्या रोखण्यासाठी शासन स्तरावरून विविध उपाययोजना राबविण्यात येत असल्या तरी त्या कायमस्वरूपी नसल्याने शेतकरी आत्महत्या रोखण्यात अपयश येत आहे.याचवेळी शासन, नेते आणि अधिकारी यांच्याकडून दुर्लक्ष होत आहे.ऐरवी भाषणात शेतकऱ्यांचे कैवारी असल्याचा आव आणणारे लोकप्रतिनिर्धी याबाबत मुग गिळुन गप्प असल्याने याबद्दल तिव्र नाराजी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबा गणेश कर यांनी व्यक्त केली आहे. सविस्तर माहितीस्तव बीड जिल्ह्यात १ जानेवारी ते ३१ आक्टोबर पर्यंत या १० महिन्यात नापिकी , कर्जबाजारीपणा, अतिवृष्टीमुळे आर्थिक नुकसान या गोष्टींमुळे तब्बल १५१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची शासन दरबारी नोंद असुन केवळ ६५ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनामार्फत दिली जाणारी १ लक्ष रुपयांची मदत मिळाली असुन उर्वरित कुटुंबिय मदतीच्या प्रतिक्षेत आहेत.याचवेळी निवडणूकीचे कामकाज असल्याचे कारण देऊन शासन आणि अधिकारी याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे तर नेते मंडळींना याचे सोयरसुतक नसल्याचे दिसून येते. मराठवाड्यात दहा महिन्यांत ७५७ शेतकरी आत्महत्या दुष्काळी पट्टा म्हणून



ओळखल्या जाणा-या मराठवाड्यात शेतकरी आत्महत्या सुरूच असुन गेल्या १० महिन्यात शेतकरी आत्महत्यांचा आकडा ७५७ वर पोहोचला आहे. या पार्श्वभूमीवर बळीराजाला आर्थिक मदतीची आवश्यकता आहे. दहा महिन्यांतील जिल्हा निहाय आत्म हत्या मध्ये बीड १५१, नांदेड १३५, धाराशिव १३०, छत्रपती संभाजीनगर १२४ , जालना ७०, परभणी ५८,लातुर ६२, हिंगोली २८ अशा एकुण ७५७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची शासन दरबारी नोंद आहे. यातील ४४७ प्रकरणात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे तर ५३ प्रकरणे वेगवेगळ्या कारणांमुळे नामंजूर करण्यात आली आहेत.तर २५७ प्रकरणे चौकशी साठी प्रलंबित आहेत.

# यशवंती आधार समाजिक संस्थेने केली निराधार,अनाथ, दिव्यांग बांधवांची दिवाळी गोड

**‘एक घास प्रेमाचा‘ या प्रेरणादायी उपक्रमाच्या माध्यमातून वृद्धाश्रम आश्रम, दिव्यांग आश्रम, अनाथ आश्रम, तसेच पालावर रस्त्याच्या कडेला व पुलाखाली राहणाऱ्या निराधार बांधवांना ब्लॅकेट व फराळ वाटून दिवाळी गोड केली.- मा.राजेश दिवटे**

**पाटोदा प्रतिनिधी**

दिवटे सर खूप बरे वाटले आपण एवढ्या प्रेमाने दिवाळी फराळ आणला आम्हाला भरवला.... हे शब्द ऐकून मन भाराहून गेले.

यशवंती आधार सामाजिक संस्थेच्या वतीने एक घास प्रेमाचा या उपक्रमाच्या माध्यमातून अनाथ, निराधार दिव्यांग बांधवांची दिवाळी गोड व्हावी म्हणून दिवाळी फराळ वाटप केला जात आहे हा उपक्रम निगडी येथिल झुंज दिव्यांग आश्रमामध्ये राबवला तसेच दिघी येथील स्नेहछाया अनाथल, आळंदी येथील आपुलकी वृद्धाश्रम तसेच पुलाखाली व



पालवर राहणा-या निराधार बांधवांसाठी राबवला. या सर्व कार्यामध्ये संस्थेचे मार्गदर्शक गोसेवक सेवक संतोष सुरवसे साहेब, महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्रमुख जयपालजी दगडे साहेब, यशवंती आधार सामजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रेरणादायी वक्ते राजेश दिवटे सर हा प्रेरणादायी उपक्रम राबवत आहेत व त्यांच्या या कार्याला भरभरून प्रतिसादही मिळत आहे.तसेच या उपक्रमासाठी ज्यांनी-ज्यांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या मदत केली त्या सर्वांचे संस्थेच्या वतीने राजेश दिवटे यांनी मनापासून आभार मानले.

## जाहिर प्रगटन

सर्व जनतेस व खासकरून बीड जिल्ह्यातील जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे सुचीत करण्यात येते की, आमचे पक्षकार नामे मंजुषा भ्र. ज्ञानदेव बंड वय ५७ वर्षे, धंदा शेती व घरकाम रा. जिजाऊ मार्ग, शाहुनगर, पांगरी रोड, बीड ता. जि. बीड यांनी दिलेल्या माहिती, अधिकार व दाखवलेल्या कागदपत्रावरुन खालीलप्रमाणे जाहीर प्रगटन देतो की, आमच्या पक्षकारांनी १) देविदास पि. गणपतराव कुरुळे, २) सोजरबाई भ्र. लक्ष्मण कुरुळे, ३) पदमीनबाई भ्र. रावसाहेब घाडगे, ४) संजीवनी भ्र. संदिपान कदम, ५) विमल भ्र. सटवाराम तपसे, ६) सुमन पि. गणपत कुरुळे, ७) शंकर पि. लक्ष्मण कुरुळे, ८) गोरख पि. लक्ष्मण कुरुळे, ९) मिरा भ्र. गोरख कुरुळे, १०) निखील पि. देवीदास कुरुळे, ११) सविता भ्र. देवीदास कुरुळे, १२) पुजा भ्र. मधुकर शेळके यांचे विरुध्द मा. दिवाणी न्यायाधिश साहेब (व.स्तर) बीड यांचे न्यायालयात वाटणी व स्वतंत्रताक मिळणे बाबत व दिनांक १२/१०/२०२३ रोजी झालेले नोंदणीकृत हक्कसोडपत्र क्र. ५००४/२०२४ हे वादीस फसवुन करून घेतलेले असल्याने वादीवर बंधनकारक नाही असे जाहीर करणे बाबत (स्पेसिफीक
रिलीफ ॲक्ट कलम ३१ आणि ३४ प्रमाणे) दावा दाखल केला आहे. त्यास रे.दि.मु.क्र. १२२/२०२४ असा पडलेला आहे. सदरील वादग्रस्त मिळकती खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | गट नंबर | क्षेत्रफळ हे. आर | आकार रु.पै. | गावाचे नाव | वादीचा हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १ | १८ | ००.२५ | ०.६८ | तळेगाव ता. बीड | १/७ प्रत्येकी |
| २ | १७ | ००.९७.५० | ०३.३४ | तळेगाव ता. बीड | १/७ प्रत्येकी |
| ३ | २० | ०१ .१ ५ | ०३.२१ | तळेगाव ता. बीड | १/७ प्रत्येकी |
| ४ | २३ | ०१ .७३ | ०३.७८ | तळेगाव ता. बीड | १/७ प्रत्येकी |
| ५ | २६ | ०१.५५ | ०१.०८ | तळेगाव ता. बीड | १/७ प्रत्येकी |
| ६ | २९ | ०२.४० | ०१.६९ | तळेगाव ता. बीड | १/७ प्रत्येकी |
| एकूण | | ८.२१ | १३.७८ | | |

या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर जमीन ही आमच्या पक्षकाराशिवाय कोणाकडुन कोणीही खरेदी-विक्रीचा व्यवहार जसे की, तोंडी व्यवहार अथवा लेखी स्वरुपात ईसारपावती, खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, आम मुखत्यारपत्र असा व्यवहार करु नये. जर आमच्या पक्षकाराचे संमती शिवाय इतर कोणाकडुनही सदर जमीनीचा तोंडी व्यवहार अथवा लेखी स्वरुपात ईसारपावती, खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, आम मुखत्यारपत्र असा व्यवहार केल्यास सदर व्यवहार आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.
सबब आहे जाहीर प्रगटन,

बीड
दिनांक : ०९/११/२०२४
मार्फत : एस. एस. नागरगोजे,
जिल्हा व सत्र न्यायालय, बीड
मो.नं. ९२८४०७८०९०

जाहीर प्रगटन देणार
मंजुषा भ्र. ज्ञानदेव बंड
मो.नं.

## किमया शब्दांची

खूपच सुंदर अशी
शब्दांचीही किमया
शब्दच देती प्रेम आणि
शब्दच देती माया....१

शब्दच खरे ही रत्ने
सुखावती जें जीवना
शब्द शस्त्रे देती मार
करती घायाळ तना....२

शब्द हेच जोडती देवा
शब्द जोडे प्रेमाभावा
शब्द फिरविता जगी
शब्द नाडती मानवा...३

शब्दांचा हा डोंगर कडा
जरी चढता वाटे भार
पण प्रेमाने चढतांना
शांतीने करती गार....४

शब्द शस्त्र हे दुधारी
शब्द देती ते आसरा
शब्द मुखातला भाला
मना देती ते घसरा....५

शब्दे घडे महाभारत
द्रौपदीची घे इज्जत
शब्द देती गारवा
मना करती सुसंस्कृत....६

-----------------------------
संतदास पु रा हिंगणकर पुणे.

# विज जोडणी देण्यास अडवणूक केली; महावितरण कंपनीस १० हजार रु दंड .

बीड (प्रतिनिधी) – ओमर टॉवर अपार्टमेंट, जम जम कॉलोनी बीड येथील रहिवाशी श्रीमती गोहर यांनी नवीन विज जोडणी साठी महावितरण कंपनीस रीतसर अर्ज सादर केला होता. महावितरणचा भोंगळ व भ्रष्ट कारभार तसेच अधिकारी अभियंत्याची मुजोरी यामुळे त्यांना वीज जोडणी देण्यास टाळाटाळ केली जात होती. महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना अनेक विनंत्या व तक्रार अर्ज करून देखील विज जोडणी मिळत नसल्याने सदर ग्राहकाने ॲड. नईम कुरेशी यांच्या मार्फत बीड येथील जिल्हा तक्रार निवारण न्यायालयात धाव घेतली. या अपार्टमेंट मधील इतर रहिवाश्यांना देखील विज जोडणी दिली जात नव्हती. त्यामुळे या अपार्टमेंट मधील अणेक रहिवाश्यांना नाविलाजाने लपून छपून व जास्तीचे पैसे मोजून इतर रहिवाश्यांच्या घरातून विज घ्यावी लागत होती. रस्त्यांवरील अतिक्रमीत जागेवर, असुरक्षित व जीवित हानीस कारणीभूत ठरणाऱ्या ठिकाणी, बेकायदेशीर विज जोडणी देणारे, आकडे टाकून वीज चोरी करणाऱ्याकडे डोळेझाक करणारे महावितरणचे अधिकारी, या अपार्टमेंट मध्ये मात्र कर्ज काढून सदनिका खरेदी करणाऱ्या सामान्य नागरिकांना कायदेशीर मागणी करूनही विज जोडणी देण्यास मुद्दाम टाळाटाळ करीत होते. सदर अपार्टमेंटचा बिल्डर ओमर मुस्ताक फारोकी याच्या थकबाकीचे कारण पुढे करून येथील रहिवाश्यांच्या सदनिकेस विज जोडणी देण्यात येत नव्हती. विज ही अत्यावश्यक गरज असून, जीवन जगण्याचा मुलभूत अधिकारात त्याची गणना होते. ग्राहकास विज जोडणी नाकारण्याची महावितरणची कृती बेकायदेशीर व घटनाविरोधी असल्याचा युक्तीवाद ॲड. नईम कुरेशी यांनी केला. तसेच बिल्डरच्या थकबाकी साठी या ग्राहकास जबाबदार ठरविण्याची महावितरणची कृती बेकायदेशीर



ॲड.नईम कुरेशी

असल्याचे त्यानी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.
दोनीही बाजूंचे पुरावे व युक्तीवाद ऐकून जिल्हा ग्राहक मंच न्यायालयाने ग्राहकास त्वरित विज जोडणी देण्याचे महावितरण कंपनीस आदेशित केले. तसेच वीज जोडणीची मागणी करूनही ती देण्यास टाळाटाळ केल्याने तक्रारदारास झालेल्या मानसिक त्रासाची भरपाई म्हणून महावितरण कंपनीने संबंधित ग्राहकास रु. १० हजार नुकसान भरपाई देण्याचे व वीज जोडणी देण्यास दिरंगाई झाल्यास ५० रु प्रती दिवस दंड देण्याचे देखील महावितरण कंपनीस आदेशित केले.
ग्राहक तक्रार निवारण न्यायालयाच्या या आदेशाने सर्व जनतेत समाधान व्यक्त केले जात असून या निर्णयामुळे महावितरण च्या मनमानी कारभारास लगाम बसेल अशी चर्चा समाज वर्तुळात होत आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १२ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# अनिलदादा जगताप यांना मराठा संग्राम पक्षाचा जाहीर पाठिंबा!

## समाजाशी एकनिष्ठ राहणाऱ्या अनिलदादांना विक्रमी मतांनी विजयी करण्यासाठी आम्ही जीवाचे रान करू- भिमराव कोकाटे पाटील

बीड, प्रतिनिधी– विधानसभा निवडणुकीच्या रनधूमाळीत बीड विधानसभा अपक्ष उमदवार मा. अनिलदादा जगताप यांच्याकडे दरदिवशी जाहीर प्रवेश होत आहेत तर अनेक मातब्बर व्यक्ती आणि संघटन अनिलदादांना पाठिंबा देत आहेत. काल दि. ११ नोव्हेंबर रोजी सायं ६.०० वाजताच्या दरम्यान बीड विधानसभा अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांना मराठा संग्राम पक्ष महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने जाहिर पाठींबा देण्यात आला आहे.

बीड विधानसभा मतदार संघात गेली अनेक वर्षापासून सामाजिक चळवळ असो, या राजकीय क्षेत्र असो या मतदार संघात अनिलदादा यांनी समाजसेवक म्हणून खूप मोठ्या प्रमाणात योगदान राहिलेले आहे. जन सामान्याच्या हितासाठी अनिलदादा यांनी कायम प्राधान्याने पुढाकार घेऊन त्यांच्या समस्या अडचणी सोडवल्या आहेत म्हणुन संपुर्ण बीड विधानसभा मतदार संघात लोकप्रिय अपक्ष उमेदवार सन्माननिय अनिलदादा जगताप यांच्या



पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. म्हणून समाजाशी एकनिष्ठ राहणा–या नेतृत्वास विधानसभा निवडणुकीत जाहीर पाठिंबा देऊन आम्हाला अनिलदादा यांची ताकद वाढवायची आहे आणि अनिलदादांना विक्रमी मतांनी विजयी करायचे आहे आणि त्यासाठी आम्ही एकजुटीने जीवाचे रान करू अशी भावना भिमराव कोकाटे पाटील संस्थापक अध्यक्ष मराठा संग्राम पक्ष महाराष्ट्र राज्य यांनी व्यक्त केली. अनिलदादा जगताप यांनी भिमराव कोकाटे पाटील यांचे स्वागत करत आभार व्यक्त केले. याप्रसंगी अनिलदादा जगताप यांच्यासोबत सहकारी कार्यकर्ते समर्थक मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## इव्हीएम यंत्रांचे द्वितीय सरमिसळीकरण पूर्ण

**बीड (प्रतिनिधी)**

बीड, दि. ११ : जिल्ह्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठीच्या इव्हीएम यंत्रांचे द्विती य सरमिसळीकरण प्रक्रिया आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात पार पडली.

जिल्ह्यातील सहाही मतदारसंघात पाठविण्यात येणा–या इव्हीएम यंत्रांचे रॅन्डमायझेशन (यादृच्छिकीकरण) पद्धतीने सरमिसळीकरण करण्यात आले. ही प्रक्रिया गेवराई, माजलगावच्या निवडणूक निरीक्षक लालटनपुई वाँगचाँग, बीड व आष्टीचे निवडणूक निरीक्षक भुवनेश प्रताप सिंह, केज व परळी विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निरीक्षक सुनील अंचिपका, जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अविनाश पाठक, प्रशिक्षणार्थी



सहायक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे यांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी सहाही मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी सर्वश्री सतीश धुमाळ, गौरव इंगोले, श्रीमती कविता जाधव, श्रीमती वसिमा शेख, दीपक वजाळे व अरविंद लाटकर यांची उपस्थिती होती. या प्रक्रियेचे अवलोकन करण्यासाठी प्रमुख राजकीय पक्षांचे प्रतिनिधी व उमेदवारही उपस्थित होते. राजकीय पक्षाचे प्रतिनिधी व उमेदवार यांना या प्रक्रियेबाबत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी सविस्तर माहिती दिली. राजकीय पक्षाचे प्रतिनिधी व उमेदवार यांनीही या प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत समाधान व्यक्त केले.

ही प्रकिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, जिल्हा पुरवठा अधिकारी ओमकार देशमुख, तंत्रज्ञ विश्वजीत लांडगे, एनआयसीचे जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी भाऊसाहेब बांगर, महादेव भोकरे, तानाजी हंगरगेकर यांनी परिश्रम घेतले.

परळीत एक, माजलगावात तीन बॅलेट युनिट

या प्रक्रियेत पाच हजार ८३८ बॅलेट यूनिट, दोन हजार ९४७ कंट्रोल यूनिट आणि तीन हजार १८९ व्हीव्हीपॅट यंत्रांचे सरमिसळीकरण करण्यात आले आहे. जिल्ह्यात केवळ परळी मतदारसंघात एक बॅलेट युनिट प्रति मतदान केंद्रांवर लागणार आहे. तर माजलगाव मतदारसंघात प्रति मतदान केंद्रांवर तीन बॅलेट युनिट लागणार आहेत. गेवराई, बीड, आष्टी व केज या मतदारसंघात प्रति मतदान केंद्रांवर प्रत्येकी दोन याप्रमाणे बॅलेट युनिट लागणार आहेत. जिल्ह्यातील सहाही मतदारसंघात मतदान केंद्रांच्या संख्येनुसार १२० टक्के प्रमाणात मतदान यंत्रे पुरविली गेली असल्यामुळे मतदान यंत्रांची कसलीही कमतरता नसल्याचे निवडणूक विभागाने कळवले आहे.

## लाडक्या बहिणीच्या विरुद्ध लाडकी बायको कराळे गुरुजींचा अजित पवारांवर खोचक शब्दांत निशाणा

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे स्टार प्रचारक नितेश कराळे गुरुजी यांनी आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली. पक्षाचे प्रमुख शरद पवार यांची आज जळगाव जिल्ह्यातील धरणगावात प्रचारसभा पार पडली. जळगाव ग्रामीणचे उमेदवार गुलाबराव देवकर यांच्या प्रचारासाठी शरद पवारांची सभा पार पडली. या सभेत कराळे गुरुजी यांनी आपल्या भाषणात अजित पवारांवर निशाणा साधला. ङ्गज्याने स्वतःची बायको लाडक्या बहिणीच्या विरोधात बायको उभी केली होती त्यांनी लाडकी बहीण योजना सुरू केली. लाडक्या बहिणीच्या विरुद्ध लाडकी बायको उभी करायची आणि त्याला नाव द्यायचं माझी लाडकी बहीणङ्क, अशी टीका कराळे गुरुजी यांनी केली. यावेळी त्यांनी जळगाव ग्रामीणचे विद्यमान आमदार मंत्री गुलाबराव पाटील यांच्यावरही टीका केली.*****

## आज शेतकरी मित्र राजेंद्र मस्के मित्रमंडळाची बैठक ..! बीड विधानसभेसाठी राजकीय भूमिका करणार जाहीर...!

( बीड प्रतिनिधी )

शेतकरीमित्र राजेंद्र मस्के पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आज सकाळी ११.०० वाजता रामकृष्ण लॉन्स बीड येथे महत्वपूर्ण बैठक आयोजित केली असून, बीड विधानसभेसाठी राजेंद्र मस्के भूमिका जाहीर करणार असल्याची माहिती मित्र मंडळाच्या वतीने दिली आहे. माजी भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिल्यांनतर शरदचंद्र पवार साहेब यांच्या नेतृत्वात मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.गेली पाच सात वर्षापासून राजेंद्र मस्के बीड विधानसभेची उमेदवारी लढवण्याची तयारी करत होते. परंतु बीडची जागा भाजपाला सोडवून घेण्यास पक्ष



श्रेष्टीला अपयश आले. बीडची जागा राष्ट्रवादीला सोडण्यात आली. यामुळे राजेंद्र मस्के यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देऊन मराठा आरक्षण संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्याकडे उमेदवारीची मागणी करत उमेदवारी अर्जही दाखल केला होता. जरांगे पाटील यांनी निवडणुकीत माघार घेतल्या नंतर त्यांच्या सुचणेप्रमाणे उमेदवारी अर्ज मागे घेतला.सकल मराठा समाजाच्या वतीने एक उमेदवार देऊन, तो निवडणून आणण्याचा एक विचार समोर आला. यासाठीही राजेंद्र मस्के यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केले. परंतु दुर्दैवाने अद्याप समाजाचा निर्णय होऊ शकला नाही. सकल मराठा समाजाचे धोरण व सामाजिक परिस्थिती लक्षात घेता ते अद्याप बीड विधानसभेच्या रणसंग्रामात उतरले नाहीत. व एक मत होण्याची शक्यताही दिसत नसल्याने आज पदाधिकारी, कार्यकर्ते, समर्थक यांच्याशी संवाद साधून राजकीय भूमिका जाहीर करणार आहेत.

## मतदान दिवसा अगोदर आणि मतदानाच्या दिवशी मुद्रित माध्यमांत जाहिरातीसाठी एमसीएमसी पूर्व प्रमाणिकरण अनिवार्य

मुंबई, दि. ११ : भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुका २०२४ – मतदान दिवसाअगोदर आणि मतदानाच्या दिवशी मुद्रित (प्रिंट) माध्यमातून कोणत्याही भडकाऊ, दिशाभूल करणा–या किंवा द्वेषपूर्ण जाहिरातींमुळे कोणतीही अप्रिय घटना घडू नये, ज्यामुळे निवडणूक प्रक्रियेला अडथळा येईल, अशा जाहिराती प्रकाशित होऊ नयेत, याबाबत मुद्रित माध्यम व सर्व संबंधितांना दक्षता घेण्याबाबत निर्देश दिले आहेत. तसेच कोणताही राजकीय पक्ष, निवडणूक उमेदवार किंवा इतर कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांनी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुका, २०२४ मतदानाच्या दिवशी ( दि. २० नोव्हेंबर २०४) आणि मतदानाच्या एक दिवस आधी (दि. १९ नोव्हेंबर २०२४) मुद्रित माध्यमांत कोणतीही राजकीय जाहिरात, जोपर्यंत राज्य/जिल्हा स्तरावरील माध्यम पूर्व प्रमाणिकरण समितीकडून (चउचउ) पूर्व – प्रमाणित केली जात नाही, तोपर्यंत प्रकाशित करु नये, अशा सूचना दिल्या आहेत. तरी सर्व संबंधितांनी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे,असे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र यांनी कळवले आहे.

# त्यांचं पुढच्या वेळेचं डिपॉझिट आताच.. भावाच्या प्रचारादरम्यान रितेश देशमुखचं लातूरकरांना आवाहन

## लातूर ग्रामीण मतदारसंघाचे काँग्रेसचे उमेदवार आणि भाऊ धीरज देशमुख यांच्यासाठी रितेशने प्रचारसभा घेतली.

विधानसभा निवडणुकीला आता अवघे दहा दिवस शिल्लक आहेत. यानिमित्त राज्यात सध्या प्रचारांची रणधुमाळी पहायला मिळत आहे. अभिनेता रितेश देशमुखने भाऊ आणि काँग्रेस-महाविकास आघाडीचे लातूर ग्रामीण मतदारसंघाचे उमेदवार धीरज देशमुख यांच्यासाठी प्रचारसभा घेतली. लातूरमधल्या या प्रचारसभेत त्याने युवकांशी संवाद साधला. धीरज देशमुख यांना भरघोस मतदान करून विजयी करावं, असं आवाहन त्याने यावेळी केलं. मंचावर बोलताना रितेशने विरोधकांवरही निशाणा साधला. “यावेळी एवढ्या जोरात बटण दाबा की पुढच्या वेळेचं डिपॉझिट आताच जप्त झालं पाहिजे त्यांचं”, अशा शब्दांत त्याने लातूरकरांना आवाहन केलं. काय म्हणाला रितेश? “हा आपला गडी आहे. या गड्याला तुम्ही मतदान करा, हा नेहमी तुमच्यासोबत राहील. एक लाख मतांनी तुम्ही त्यांना विजयी केलं होतं. गेली पाच वर्षे इतक्या प्रामाणिकपणे धीरजने काम केलंय.. सतत.. मुंबई असो, लातूर ग्रामीण असो.. मी पाहिलंय. आम्ही घरी असतानासुद्धा सांगायचा की, दादा मी चाललोय, गावाकडे कार्यक्रम आहे, लोकांची कामं करायची आहेत. ही जी मनाची चढाओढ असते ना की लोकांचं आपल्याला काम करायचं आहे, लोकांच्या डोळ्यातले अश्रू आपल्याला पुसायचे आहेत, आपल्या आई-बहिणींचा जो त्रास आहे तो कमी करायचा आहे,” असं रितेश म्हणाला. सरकारवर निशाणा साधत तो पुढे म्हणाला, “आज आपले युवक लातूर पॅटर्नमध्ये शिक्षण घेतायत, पण रोजगार आहे का तुमच्या हाताला आज? रोजगार द्यायची जबाबदारी कोणाची? ही सरकारची जबाबदारी आहे. आहे का तुमच्याकडे रोजगार? पिकापाण्याला भाव आहे का? येत्या वीस तारखेला, जे बटण तुम्ही दाबणार आहात ना, खरंच म्हणाले.. की यात एक आमदार तर होणारच आहे. आता जे विरोधक आहे तेही आमदार आहेच, त्यांना या बटणची गरज नाही. दोन-दोन आमदार मिळतीलच तुम्हाला एका बटणात. गेल्या वेळेस एक लाखाची लीड होती. पण यावेळी एवढ्या जोरात बटण दाबा की पुढच्या वेळेचं डिपॉझिट आताच जप्त झालं पाहिजे त्यांचं.” लातूर ग्रामीण



विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीकडून काँग्रेसतर्फे आमदार धीरज देशमुख तर महायुतीकडून भाजपचे विधान परिषदेचे आमदार रमेश कराड उमेदवार आहेत. 2019 मध्ये प्रतिस्पर्धी उमेदवार मतदारसंघात फिरकला नसल्याने काँग्रेससाठी ही एकतर्फी निवडणूक झाली होती.

### काय म्हणाला रितेश?

हा आपला गडी आहे. या गड्याला तुम्ही मतदान करा, हा नेहमी तुमच्यासोबत राहील. एक लाख मतांनी तुम्ही त्यांना विजयी केलं होतं. गेली पाच वर्षे इतक्या प्रामाणिकपणे धीरजने काम केलंय.. सतत.. मुंबई असो, लातूर ग्रामीण असो.. मी पाहिलंय. आम्ही घरी असतानासुद्धा सांगायचा की, दादा मी चाललोय, गावाकडे कार्यक्रम आहे, लोकांची कामं करायची आहेत. ही जी मनाची चढाओढ असते ना की लोकांचं आपल्याला काम करायचं आहे, लोकांच्या डोळ्यातले अश्रू आपल्याला पुसायचे आहेत, आपल्या आई–बहिणींचा जो त्रास आहे तो कमी करायचा आहे,ङ्घ असं रितेश म्हणाला.

# जो पाजील माझ्या नवऱ्याला दारु, त्या उमेदवाराला नक्कीच पाडू, विधानसभा निवडणुकीत अभियान, लागले बॅनर




**मुंबई प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत सर्व उमेदवार प्रचारासाठी आता रात्रंदिवस एक करत आहे. उमेदवारांच्या मागे कार्यकर्त्यांची फौज असते. मग कार्यकर्त्यांना खूश ठेवण्याचा प्रयत्न सर्वच उमेदवारांकडून होतो. मग चिकन, मटण, दारु...हवे ते कार्यकर्त्यांना मिळत असते. कार्यकर्ते नाराज होऊ नये, यासाठी पाण्यासारखा पैसा उमेदवार खर्च करत असतो. परंतु आता विधानसभा निवडणुकीत अनोखे अभियान सुरु झाले आहे. 'जो पाजील माझ्या नवऱ्याला दारु, त्या उमेदवाराला नक्कीच पाडू', असे अभियान सुरु झाले.

## कोणत्या संस्थेचा उपक्रम

गडचिरोली जिल्ह्यातील तिन्ही विधानसभेत मुक्ती पथमार्फत अभियान सुरु केले आहे. ज्येष्ठ समाजसेवक डॉक्टर अभय बंग आणि राणी बंग यांनी स्थापन केलेली मुक्ती पथ ही संस्था आहे. या संस्थेने महिलांना आवाहन केले आहे. त्यासाठी बॅनर लावले आहे. निवडणुकीत जो उमेदवार दारू पाजेल किंवा दारू वाटप करेल त्या उमेदवाराला नक्कीच पाडा, असा आवाहन डॉक्टर अभय बंग यांच्याकडून करण्यात येत आहे.

## या ठिकाणी लागले बॅनर

गडचिरोली जिल्ह्यात दारु बंदीसाठी मुक्ती पथ ही संस्था मोठे कार्य करत आहे. ग्रामीण भागासह सर्वत्र दारु बंदीसाठी जनजागृती आणि समुपदेशनचे काम ही संस्था करते. गडचिरोली जिल्ह्यात तीन विधानसभा मतदार संघ आहे. त्यात गडचिरोली, आरमोरी, अहेरी या मतदार संघांचा समावेश आहे. मुक्तीपथ मार्फत अनेक बॅनर लावलेले दिसत आहेत. त्यावर म्हटले आहे की, जो पाजील माझ्या नवऱ्याला दारु, त्या उमेदवाराला नक्कीच पाडू

## या संस्थेने महिलांना आवाहन केले आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील तिन्ही विधानसभेत मुक्ती पथमार्फत अभियान सुरु केले आहे. ज्येष्ठ समाजसेवक डॉक्टर अभय बंग आणि राणी बंग यांनी स्थापन केलेली मुक्ती पथ ही संस्था आहे. या संस्थेने महिलांना आवाहन केले आहे.

# पुण्य पडले पदरी; १०५ जणांनी केले रक्तदान: बळीराजा प्रतिष्ठान, रकाळा ग्रुपच्या वतीने आयोजीत केले होते रक्तदान शिबीर



बीड: जिल्हा रूग्णालयातील रक्ताचा तुटवडा कमी करण्यासाठी बळीराजा प्रतिष्ठाण आणि रंकाळा ग्रुपच्या वतीने श्री.क्षेत्र नारायण गडाचे विश्वस्त बळीराम गवते पाटील यांच्या वाढदिवसानिमीत्त दि.१० नोव्हेंबर रोजी रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते. या शिबीरात १०५ जणांनी रक्तदान करून पुण्य पदरी पाडून घेतले.जिल्हा रूग्णालयात रूग्णांची संख्या वाढत असून याठिकाणी रक्ताची मोठी गरज निर्माण होते. रूग्णालय प्रशासन आणि अनेक सामाजिक संस्था रक्तदान शिबीरे घेवून रक्तसंकलन करत असतात. परंतु आपणही समाजाचे काही देणे लागतो, अशा उदात्त हेतून बळीराजा प्रतिष्ठाण आणि रंकाळा ग्रुपने धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नारायण गडाचे विश्वस्त बळीराम गवते यांच्या वाढदिवसानिमीत्त दरवर्षी प्रमाणे दि.१० नोव्हेंबर रोजी बळीराजा कॉम्पेल्स, चाणक्यपुरी येथे रक्तदान शिबीर आयोजीत केले होते. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींनी रक्दान शिबीराला भेटी देऊन उत्स्फ ुर्तपणे रक्तदान केले. बळीराजा प्रतिष्ठाण आणि रंकाळा ग्रुपच्या माध्यमातून रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते. सकाळी दहा वाजता सुरू झालेले रक्तदान शिबीर चार वाजेपर्यंत सुरू होते. जिल्हा रूग्णालयातील रक्तपेढी विभागाचे अधिकारी–कर्मचारी यावेळी उपस्थित होते. बळीराम गवते यांचा मोठा मित्र परिवार असून सकाळीपासून रक्तदानासाठी गर्दी होती. तब्बल १०५ जणांनी यावेळी रक्तदान केले. याठिकाणी रक्तदात्यांसाठी चहा–नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती.




# ८.१६ % महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२४ ची परतफेड

मुंबई, दि. ११ : महाराष्ट्र शासनाने पूर्वी खुल्या बाजारातून उभारलेल्या ८.१६ % महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२४ अदत्त शिल्लक रकमेची परतफेड दि. ९ डिसेंबर, २०२४ पर्यंत देय असलेल्या व्याजासह दि. १० डिसेंबर, २०२४ रोजी सममूल्याने परतफेड करण्यात येईल, असे वित्त विभागाच्या (वित्तीय सुधारणा), सचिव श्रीमती शैला ए. यांनी प्रसिद्धीपत्राद्वारे कळवले आहे. ङ्गपरक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ अन्वये महाराष्ट्र शासनाने उपरोक्त दिनांकास सुटी जाहीर केल्यास, राज्यातील अधिदान कार्यालय, कर्जाची परतफेड अगोदरच्या काम ाच्या दिवशी करेल. या कर्जावर दि. १० डिसेंबर २०२४ पासून व त्यानंतर कोणतेही व्याज अदा करण्यात येणार नाही.

सरकारी प्रतिभूती विनियम, २००७ च्या उप–विनियम २४ (२) व २४(३) अनुसार, दुय्यम सर्वसाधारण खातेवही लेखा किंवा रोखे प्रम ाणपत्र यांच्या स्वरुपातील शासकीय रोख्यांच्या नोंदणीकृत धारकाकडील मुदत समाप्ती उत्पन्नाचे प्रदान हे, इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत जमा निधीची सुविधा असलेल्या कोणत्याही बँकेतील धारकाच्या खात्यात जमा करुन त्याच्या बँक खात्याचे संबधित तपशिलांसह प्रदानादेशाव्दारे करण्यात येईल. रोख्यांच्या बाबतीतील प्रदान करण्यासाठी, अशा रोख्यांचा मूळ वर्गणीदार किंवा यथास्थिती उत्तरवर्ती धारक, बँकेकडे किंवा कोषागाराकडे किंवा भारतीय स्टेट बँकेच्या शाखेच्या उप–कोषागाराकडे किंवा यथास्थिती त्यांच्या दुय्यम बँकांकडे जर त्यांना व्याज प्रदान करण्यासाठी मुखांकित करण्यात आले असल्यास/ त्यांची नोंदणी करण्यात आली असल्यास त्याच्याकडे, त्यांच्या बँक खात्याचा संबंधित तपशील सादर करतील.तथापि, बँक खात्याच्या संबधित तपशिलाच्या/इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत निधी जमा करण्याच्या आदेशाच्या अभावी, नियत दिनांकास परतफेड करणे सुलभ व्हावे यासाठी, ८.१६ % महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२४ च्या धारकांनी, लोक ऋण कार्यालयात २० दिवस अगोदर त्यांचे रोखे सादर करावेत. रोख्यांच्या मागील बाजूस ङ्ग प्रमाणपत्रावरील देय मुद्दलाची रक्कम मिळाली.ङ्ग, असे यथोचितरीत्या नमूद करुन ते रोखे परतफेडीसाठी सादर करावेत.

८.१६ % महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२४ ची परतफेड

मुंबई, दि. ११ : महाराष्ट्र शासनाने पूर्वी खुल्या बाजारातून उभारलेल्या ८.१६ % महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२४ अदत्त शिल्लक रकमेची परतफेड दि. ९ डिसेंबर, २०२४ पर्यंत देय असलेल्या व्याजासह दि. १० डिसेंबर, २०२४ रोजी सममूल्याने परतफेड करण्यात येईल, असे वित्त विभागाच्या (वित्तीय सुधारणा), सचिव श्रीमती शैला ए. यांनी प्रसिद्धीपत्राद्वारे कळवले आहे. ङ्गपरक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ङ्ग अन्वये म हाराष्ट्र शासनाने उपरोक्त दिनांकास सुटी जाहीर केल्यास, राज्यातील अधिदान कार्यालय, कर्जाची परतफेड अगोदरच्या कामाच्या दिवशी करेल. या कर्जावर दि. १० डिसेंबर २०२४ पासून व त्यानंतर कोणतेही व्याज अदा करण्यात येणार नाही.

सरकारी प्रतिभूती विनियम, २००७ च्या उप–विनियम २४ (२) व २४(३) अनुसार, दुय्यम सर्वसाधारण खातेवही लेखा किंवा रोखे प्रम ाणपत्र यांच्या स्वरुपातील शासकीय रोख्यांच्या नोंदणीकृत धारकाकडील मुदत समाप्ती उत्पन्नाचे प्रदान हे, इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत जमा निधीची सुविधा असलेल्या कोणत्याही बँकेतील धारकाच्या खात्यात जमा करुन त्याच्या बँक खात्याचे संबधित तपशिलांसह प्रदानादेशाव्दारे करण्यात येईल. रोख्यांच्या बाबतीतील प्रदान करण्यासाठी, अशा रोख्यांचा मूळ वर्गणीदार किंवा यथास्थिती उत्तरवर्ती धारक, बँकेकडे किंवा कोषागाराकडे किंवा भारतीय स्टेट बँकेच्या शाखेच्या उप–कोषागाराकडे किंवा यथास्थिती त्यांच्या दुय्यम बँकांकडे जर त्यांना व्याज प्रदान करण्यासाठी मुखांकित करण्यात आले असल्यास/ त्यांची नोंदणी करण्यात आली असल्यास

# मी जातपात नाही पाळली. मी जातीवादी राजकारण कधीही केलं नाही राज ठाकरे



राज ठाकरे यांनी विधानसभा निवडणूकीत आपले उमेदवार उभे केलेले आहेत. विधानसभा निवडणूकीचा प्रचार टीपेला पोहचला असताना राज ठाकरे यांनी टीव्ही 9 मराठीला मुलाखत दिली आहे. टीव्ही 9 मराठीचे व्यवस्थापकीय संपादक उमेश कुमावत यांनी ही मुलाखत घेतली.या मुलाखतील राज ठाकरे यांनी राज्यातील ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यावर देखील रोखठोक भाष्य केले आहे. या शरद पवार यांनी राज ठाकरे यांच्यावर टीका करताना ज्यांनी आयुष्यात काही काम केले नाही ते माझ्यावर बोलत आहे. या संदर्भात राज ठाकरे यानी जोरदार उत्तर दिले आहे. उमेश कुमावत यांनी या मुलाखतीत राज ठाकरे यांना शरद पवार यांच्या राज ठाकरे यांनी उभ्या आयुष्यात काही केले नाही या विधानाची क्लीप दाखविली. ही क्लीप राज ठाकरे यांनी पाहीली आणि त्याला त्यांनी उत्तर दिले. या वेळी राज ठाकरे म्हणाले की त्यांना वयानुसार गोष्टी काही गोष्टी आठवत नसेल. मी ज्या अनेक गोष्टी केल्या आहेत ना, त्याची एक पुस्तिका पाठवतो असेही राज ठाकरे यावेळी म्हणाले. राज ठाकरे यांनी यावेळी म्हणाले की माझ्याकडून एक गोष्ट नाही झाली. मी जातपात नाही पाळली. मी जातीवादी राजकारण कधीही केलं नाही. शरद पवार यांचे राजकारण महाराष्ट्राला माहिती आहे. मागच्या बाजूने पिल्ले सोडायची हे सर्व महाराष्ट्राला माहीत आहे. छोट्या मोठ्या संघटना उभ्या करायच्या त्यांना पैसे पुरवायचे या गोष्टी सर्वांना माहीत आहे. काही गोष्टी मला पर्सनली बोलायच्या नाही. नाही तर त्याही बोललो असतो. पण त्याचा राजकारणाशी संबंध नाही असेही राज ठाकरे म्हणाले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com